# अर्थ साक्षरता प्रसाराला गती अपेक्षित : कुलगुरू

## शिवाजी विद्यापीठाचा ‘रवळनाथ’समवेत सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

सहकारी क्षेत्रातील बहुराज्य संस्था असलेल्या श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स सोसायटीसमवेत शिवाजी विद्यापीठाने केलेल्या सामंजस्य करारामुळे अर्थ साक्षरता प्रसार, प्रशिक्षण व संशोधन कार्याला गती येईल, अशी अपेक्षा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केली.

आजरा येथील मल्टिस्टेट संस्था श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स सोसायटी आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यादरम्यान व्यवस्थापन परिषद सभागृहात सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, ‘रवळनाथ’चे संस्थापक व अध्यक्ष एम. एल. चौगुले प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि आजरा येथील मल्टिस्टेट संस्था श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स सोसायटी यांच्यातील सामंजस्य कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या उपस्थितीत कराराचे हस्तांतरण करताना कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व एम. एल. चौगुले. सोबत अन्य मान्यवर.**

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रामध्ये अर्थ साक्षरता प्रसाराची मोठी गरज आहे. विद्यार्थी, संशोधकांबरोबरच सर्वसामान्य नागरिकांमध्येही यासंदर्भातील जाणीव जागृती आवश्यक आहे. त्यादृष्टीने ‘रवळनाथ’च्या सहकार्याने राज्यस्तरीय, राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा व चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येईल, ज्याचा सर्वच घटकांना लाभ होईल. सहकार, वाणिज्य व व्यवस्थापन तसेच अर्थशास्त्र आदी क्षेत्रांतील संयुक्त संशोधन प्रकल्प, अभ्यास हाती घेण्यात याव्यात, जेणे करून अधिकाधिक समाजाभिमुख काम या सामंजस्य कराराच्या माध्यमातून साकार व्हावे. दिल्लीतील राष्ट्रीय सहकार संघामार्फत ‘रवळनाथ’ला सभासद प्रशिक्षणासाठी ३ लाख रुपयांचे अनुदान प्राप्त झाल्याबद्दल कुलगुरूंनी संस्थेचे अभिनंदनही केले.

सामंजस्य करारावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि एम. एल. चौगुले यांनी स्वाक्षरी केल्या. याप्रसंगी चौगुले यांनी ‘रवळनाथ’तर्फे गरजू विद्यार्थ्यांसाठी म्हणून एक लाख रुपयांचा निधी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला. प्रास्ताविक डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले. डॉ. नांदवडेकर यांनी आभार मानले. डॉ. विजय ककडे, प्रा. विजय आरबोळे, प्रा. मीना टिंगणे, रेखा पोतदार, विद्यापीठाचे माजी वित्त व लेखाधिकारी जी. के. नाईक, विजयकुमार हरगुडे, आदी उपस्थित होते.

# अर्थसाक्षरता प्रसार, संशोधनाला गती

## शिवाजी विद्यापीठ - श्री रवळनाथ सोसायटी यांच्यात सामंजस्य करार



श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स सोसायटीच्यावतीने संस्थापक एम. एल. चौगुले यांनी गरजू विद्यार्थ्यांसाठी एक लाख रुपयांच्या मदत निधीचा धनादेश कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपूर्द केला.

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ आणि आजरा येथील श्री रवळनाथ को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग फायनान्स सोसायटी यांच्यात गुरुवारी सामंजस्य करार झाला. त्याच्या माध्यमातून अर्थसाक्षरता प्रसार, प्रशिक्षण व संशोधन केले जाणार आहे.

विद्यापीठातील व्यवस्थापन परिषदेच्या सभागृहातील या कराराच्या कार्यक्रमावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, 'रवळनाथ'चे संस्थापक एम. एल. चौगुले प्रमुख उपस्थित होते. या करारावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि एम. एल. चौगुले यांनी स्वाक्षरी केली. विद्यार्थी, संशोधकांबरोबरच सर्वसामान्य नागरिकांमध्ये अर्थसाक्षरतेसंदर्भातील जाणीव-जागृती आवश्यक आहे. त्यादृष्टीने 'रवळनाथ'च्या सहकार्याने राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय परिषदा, कार्यशाळा, चर्चासत्रांचे आयोजन करण्यात येईल, असे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. अर्थ, सहकार व वाणिज्य आदी क्षेत्रांमध्ये अनेक नवनवीन प्रवाह निर्माण होत आहेत. अनेक संधी, आव्हाने सामोरी येत आहेत. त्यादृष्टीने प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याच्यादृष्टीने हा करार उपयुक्त ठरणार असल्याचे डॉ. चौगुले यांनी सांगितले.

यावेळी डॉ. विजय ककडे, विजय आरबोळे, मीना टिंगणे, रेखा पोतदार, जी. के. नाईक, विजयकुमार हरगुडे आदी उपस्थित होते. डॉ. एम. एस. देशमुख यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. नांदवडेकर यांनी आभार मानले.

### विद्यार्थ्यांसाठी निधी

या करारावेळी 'रवळनाथ'च्यावतीने गरजू विद्यार्थ्यांसाठी एक लाख रुपयांचा निधी कुलगुरु डॉ. शिर्के यांच्याकडे डॉ. चौगुले यांनी सुपूर्द केला.

# महाविद्यालये सुरू करण्याची तयारी

## शिवाजी विद्यापीठाकडून परिपत्रक; ५० टक्के विद्यार्थी उपस्थिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

महाविद्यालये १५ फेब्रुवारीपासून सुरू करण्याची शिवाजी विद्यापीठाने तयारी सुरू केली आहे. त्या अनुषंगाने गुरुवारी महाविद्यालयांसाठी परिपत्रक काढले आहे.

राज्य सरकारने महाविद्यालये १५ फेब्रुवारीपासून ५० टक्के विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत रोटेशननुसार महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रात सुमारे २७६ महाविद्यालये, विद्यापीठात ४० अधिविभाग आहेत. विद्या परिषद, व्यवस्थापन परिषद या अधिकार मंडळाची मान्यता घेऊन गुरुवारी महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात परिपत्रक विद्यापीठाने संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे.

महाविद्यालयांकडूनही नियोजन सुरू झाले आहे. सॅनिटायजेशन व इतर गोष्टींबाबतचे नियोजन सुरू केले आहे. विद्यार्थ्यांच्या ५० उपस्थितीबाबत शासन निर्देशाचे पालन करण्यात येणार असल्याचे न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी सांगितले.

> यूजीसीच्या व राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करून महाविद्यालये, विद्यापीठातील अधिविभाग सुरू करण्यासंदर्भातची शिफारस विद्यापरिषद, व्यवस्थापन परिषदेस केली होती. ती अधिकार मंडळाने मान्य केली आहे. त्यामुळे १५ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू करण्यास अडचण येणार आहे.
>
> **- डॉ. डी. जी. कणसे,**
> अध्यक्ष, महाविद्यालये सुरू करणे समिती

# पदवीचे वर्ग सुरू करण्याबाबत महाविद्यालयांना सूचना

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विविध अधिविभाग आणि कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांमधील पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे वर्ग सोमवारपासून (दि. १५) नियमित भरविण्यात यावेत, अशी सूचना शिवाजी विद्यापीठाने गुरूवारी दिली. त्याबाबतचे ई-मेल विद्यापीठ प्रशासनाने अधिविभाग, महाविद्यालयांना पाठविले आहेत.

महाविद्यालयांमध्ये वर्ग भरविण्याबाबत शासन आदेशानुसार कार्यवाही करण्यासाठी विद्यापीठाने विद्या परिषद, व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेतली. त्यानंतर वर्ग भरविण्याबाबतच्या विविध सूचना या ई-मेलव्दारे केल्या आहेत. त्यामध्ये विद्यार्थ्यांच्या सोयीनुसार ऑफलाईन, ऑनलाईन परीक्षा घेणे, वर्गातील उपस्थितीबाबत विद्यार्थ्यांना सक्ती करण्यात येऊ नये, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांची कोरोना तपासणी करण्याबाबत प्रशासनासमवेत चर्चा करणे, आदी सूचनांचा समावेश आहे.

# महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात विद्यापीठाने केले परिपत्रक जाहीर

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सर्व आधीविभाग, महाविद्यालय, शिक्षण संस्था यांना १५ फेब्रुवारी रोजी राज्य शासन आणि यूजीसीच्या नियमानुसार महाविद्यालय सुरू करा, अशा सूचना एका परिपत्रकाद्वारे शिवाजी विद्यापीठाने दिल्या आहेत.

राज्य शासनाने महाविद्यालय सुरू करण्यासाठी परवानगी दिल्यानंतर विद्यापीठाने नियुक्त केलेल्या डॉ. डी. जी. कणसे समितीची बैठक घेतली. त्यानंतर विद्या परिषद, व्यवस्थापन परिषद या अधिकार मंडळाची मान्यता घेऊन गुरुवारी महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले आहे. तरी महाविद्यालयांनी या परिपत्रकाचाप्रमाणे नियमांचे पालन करीत, महाविद्यालय सुरू करावे, असे आव्हान विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

# महाविद्यालये सुरू करा : नांदवडेकर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या आदेशानुसार १५ फेब्रुवारीपासून महाविद्यालये सुरू करण्यात यावीत, अशा सूचना शिवाजी विद्यापीठ प्रशासनातर्फे विद्यापीठातील अधिविभाग, सलग्नीत महाविद्यालये तसेच बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत यांना देण्यात आल्या आहेत. याबाबतचे पत्र विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी गुरुवारी पाठवले आहे.

# विद्यापीठात यूजीसी स्ट्राईड ऑनलाईन राष्ट्रीय व्याख्यानमाला

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातील भूगोलशास्त्र अधिविभागातील यूजीसी स्ट्राईड ऑनलाईन राष्ट्रीय व्याख्यानमाला नुकतीच झाली. व्याख्यानमालेत मरीन बायोडायव्हर्सिटी, पॉप्युलेशन डायनामिक, एअर पॉप्युलेशन अँड कोव्हिड-१९ आदी विषयांवर डॉ. सब्यासाची साऊते, गोवा, डॉ. पी. के. पाठक, जेएमआय, नवी दिल्ली, डॉ. प्रसन्नजित आचार्य, पश्चिम बंगाल या तज्ज्ञांचे मार्गदर्शन केले. व्याख्यानमालेचे समन्वयक म्हणून डॉ. एस. दंडपथ यांनी काम पाहिले. यावेळी विभागप्रमुख डॉ. संभाजी शिंदे, युजीसी स्ट्राईडचे प्रमुख डॉ. एस. एस. पन्हाळकर आदी उपस्थित होते.



# 'खेळे' लोककलेने दुमदुमतो गावाचा चव्हाटा

## चंदगड तालुक्यातील पारंपरिक कला प्रकार; डफ, कासाळ व नळी यांचा वापर

संदीप खांडेकर :
सकाळ वृत्तसेवा

**» जागर लोककलांचा भाग- ५**

कोल्हापूर, ता. ११ : 'प्रथम सूर्य उगावला, सूर्य नमस्कार केला, आदी वाड गे आई, पैल्या दुधावैली शाई' या जतीने खेळ्याची सुरवात होते. पुढे जतीत रामायणाची कथा उलगडत जाते. लोककलांत सोंगे व खेळे हे प्रकार विशेष प्रसिद्ध. सोंगे कोकणातही खेळले जातात. पण, खेळे हा लोककला प्रकार केवळ चंदगडमध्येच पाहायला मिळतो. मार्चमध्ये शिमग्याच्या वेळी चंदगड तालुक्यात गावोगावी सोंग्यांसह खेळे हा लोककला प्रकार उत्साहाने सादर होतो.

सोंगांमध्ये गावातील काही तरुण वेगवेगळी वेशभूषा करून दारोदारी जात तत्कालीन सामाजिक प्रश्नांवर भाष्य करणारी गाणी गातात; तर खेळे या सामूहिक लोककला प्रकारात तीन संगीत साथीदारांबरोबर किमान दहा साथीदार असतात. संगीत साथ देताना डफ, कासाळ व नळी या संगीत साधनांचा वापर केला जातो.

चंदगड तालुक्यात शिमग्याच्या पहिल्याच दिवशी रात्री व्हळीचे लग्न होते. लग्न लावताना खेळे जत म्हटली जाते आणि व्हळीच्या लग्नाचा विधी पूर्ण होतो. खेळ्यांना या दिवशी झालेली सुरवात शिमगा शिंपण्याला म्हणजेच रंगपंचमी दिवशी संपते. खेळ्यांनी गावातील चव्हाटा दुमदुमतो. रोज रात्री चव्हाट्यावर लयबद्ध 'जती' लोकांना ताल धरायला लावतात. व्हळीच्या आसपास पेटवलेल्या हुलगा (शेकोटी)भोवती फेरा धरून खेळे सात दिवस उत्साहाने सादर केले जातात. खेळ्याचे स्वरूप धनगरी गजी नृत्याजवळ जाणारे असते. खेळे प्रकारातून रामायण लोकांसमोर सांगितले जाते. रामायणातील पात्रे श्रोत्यांपुढे उभी केली जातात.

पूर्वीच्या प्रथेत तळीत कमी-जास्त पैसे पडल्यास गावचे लोक त्यात भर घालत. त्यातून बकऱ्यांचा मान दिला जायचा. पुढे प्रसाद म्हणून प्रत्येक घरात त्याचा वाटा पोचविला जायचा. मानाची बकरी कापण्याचा प्रकार सोडला तर बाकी शिमगा मोठाच होत आहे.

### शिमग्यात सादरीकरण

शिमग्यात ही लोककला सादर केली जाते. या लोककलेचे स्वरूप धनगरांच्या गजीनृत्याशी जवळ जाणारे. परंतु गीते वेगळी. ही कला महाराष्ट्रात केवळ चंदगड परिसरातच विशेषत्वाने दिसते, असे प्रा. डॉ. नंदकुमार मोरे आवर्जून सांगतात.



(लोककला सादर करणारे कलाकार)